**परिशिष्ठ ब**
**नगर उप अभिंयता, विकेंद्रित कामे विभाग क्र.३, पुणे महानगपालिका**
**सन २००९-१०**

**<u>पथ-</u>**

सन २००९-१० चे मनपा अंदाजपत्रकातील पथ विभागा साठी र.रु.१९१७.०० लक्ष तरतुद उपलब्ध होती. सदर तरतुदी मधुन ११२३०० चौ.मी.( २२.२९ कि.मी. लांबी)चे रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आलेले आहे.

तसेच ११०८८ चौ.मी.चे कॉंक्रिटी करण व १७०५० चौ.मी.चे इंटलॉकिंग ब्लॉक बसविण्यात आले आहे.तसेच ५४०० चौ.मी.चे ग्राउटचे काम व १५० र.मी. फुटपाथ करण्यात आले आहे.

**<u>भवन-</u>**

सन २००९-१० चे मनपा अंदाजपत्रकातील भवन विभागा साठी र.रु.५०५.०९ लक्ष तरतुद उपलब्ध होती. सदर तरतुदी मधुन र.रु.२८३.३८ लक्ष खर्च करुन ७४०५ चौ.मी.चे नविन बांधकाम- समाज मंदिर, अभ्यासिका,व्यायामशाळा बांधणे, दवाखाना दुरुस्ती व फर्निचर विषयक सुधारणा कामे करण्यात आली आहे.

**<u>ग.व.नि.-</u>**

सन २००९-१० चे मनपा अंदाजपत्रकातील ग.व.नि.विभागा साठी र.रु.६०४.५० लक्ष तरतुद उपलब्ध होती. सदर तरतुदी मधुन ६ इंची, १० इंची,१२ इंची, १८ इंची, २४ इंची व्यासाची १४२५१.७० र.मी. नविन ड्रेनेज लाईन टाकणेत आली आहे व विविध ठिकाणी ९० सिट्सचे शौचालय नव्याने बांधण्यात आले व ५५७२ चौ.मी.शहाबाद फरशी बसविण्यात आली.

**<u>ड्रेनेज -</u>**

सन २००९-१० चे मनपा अंदाजपत्रकातील ड्रेनेज विभागा साठी र.रु. ८४४.२५ लक्ष तरतुद उपलब्ध होती. सदर तरतुदी मधुन १२ इंची, १८ इंची, २४ इंची व्यासाची ७१९२ र.मी. नविन ड्रेनेज लाईन टाकणेत आली आहे तसेच ६२१ र.मी.नाला चॅनलायझेशनचे व ३६० र.मी. सिमाभिंत/रिटेनिंग वॉलचे काम करणेत आले आहे

**नगर उप अभिंयता, विकेंद्रित कामे विभाग क्र.३, पुणे महानगपालिका कार्यालयाकडील सन २०१०-११ मधील कामकाज कार्यपुर्ती अहवाल**

**<u>पथ-</u>**

सन २०१०-११ चे मनपा अंदाजपत्रकातील पथ विभागातील एकुण ९५ कामांसाठी एकुण र.रु.१७१६.१० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदी मधुन २४२७२९ चौ.मी.( ३४.६७ कि.मी. लांबी)चे रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात येणार आहे.
तसेच काँक्रिटी करण , इंटलॉकिंग ब्लॉक, ग्राउटचे काम, फुटपाथचे काम करण्यात येणार आहे.

**<u>भवन-</u>**

सन २०१०-११ चे मनपा अंदाजपत्रकातील भवन विभागातील ५१ कामांसाठी र.रु.८१९.८० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदी मधुन ८१९८ चौ.मी.चे नविन बांधकाम करण्यात येणार आहे त्या मध्ये समाज मंदिर, अभ्यासिका,व्यायामशाळा बांधणे, दवाखाना दुरुस्ती व फर्निचर विषयक सुधारणा कामे करण्यात येणार आहे.

**<u>ग.व.नि.-</u>**

सन २०१०-११ चे मनपा अंदाजपत्रकातील ग.व.नि.विभागातील २६ कामांसाठी र.रु.३३७.२६ लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदी मधुन ६ इंची, १० इंची,१२ इंची, १८ इंची, २४ इंची व्यासाची नविन ड्रेनेज लाईन टाकणेत येणार आहे तसेच विविध ठिकाणी शौचालये नव्याने बांधण्यात येणार आहेत तसेच गल्लीबोळात काँक्रिटीकरण करणे, रफ शहाबाद फरशी बसविणे इ.कामे करण्यात येणार आहे.

**<u>ड्रेनेज -</u>**

सन २०१०-११ चे मनपा अंदाजपत्रकातील ड्रेनेज विभागातील ५२ कामांसाठी र.रु. ८३६.५७ लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदी मधुन ६ इंची, १० इंची, १२ इंची, १८ इंची, २४ इंची व्यासाची नविन ड्रेनेज लाईन टाकणेत येणार आहे तसेच नाला चॅनलायझेशनचे व सिमाभिंत/रिटेनिंग वॉलचे काम करणेत येणार आहे.

वरील सर्व विभागाअंतर्गत कामांसाठी एप्रिल ते मे पुर्वगणनपत्रक तयार करणे, जुन ते जुलै अखरे निविदा प्रक्रिया करणे, ऑगस्ट ते मार्च निविदा मान्य करण्याची प्रक्रिया पुर्ण करुन कामे पुर्ण करण्यात येणार आहे.